| MHLA130006522024 | दाखल दिनांक | : | १२.०७.२०२४ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | १२.०७.२०२४ | | |
| | निकाली दिनांक | : | ०५.०८.२०२६ | | |
| | कालावधी | : | **व.** | **म.** | **दि.** |
| | | | ०२ | ०० | २३ |

**<u>न्यायदंडाधिकारी वर्ग १ रेणापूर जि.लातूर यांचे न्यायालयात</u>**

**(<u>पिठासीन अधिकारी श्रीमती पूजा आनंद आपटे</u>)**

(दि. ०५ ऑगस्ट २०२६ रोजी पारीत)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०८/२०२४**

**(निशाणी क्र.१३ लगत)**

(रेणापूर पोलीस स्टेशन गु. र. नं. १४७/२०२४
भा.द.वि.कलम २९४,३२३,५०४, ५०६ सह ३४ अन्वये )

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | – | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस निरीक्षक, रेणापूर पोलीस ठाणे,<br>जि. लातूर. |
| अभियोगपक्षातर्फे | – | श्री.जे.आर. शेख सहा. सरकारी अभियोक्ता. |
| तक्रारदार | – | राजकुमार गोपाळ आकनगिरे,<br>वय – ५२ वर्ष, धंदा – शेती,<br>रा.रेणापूर,ता.रेणापूर, जि.लातूर. |
| आरोपी | – | १. **बाळू उर्फ तुकाराम व्यंकट आरदवाड,**<br>वय – ३७ वर्ष, धंदा – शेती,<br>**२. उत्तम व्यंकट आदरवाड,**<br>वय– ३६ वर्ष, शंदा–शेती<br>दोघे रा. रेणापूर, ता. रेणापूर, जि.लातूर. |
| आरोपीतर्फे | – | श्री.आर.आर.खाडप व श्री.एम.डी.माने<br>विधीज्ञ. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | – | दि.०१.०४.२०२४ |
| प्रथम खबरची तारीख | – | दि.०१.०४.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | – | दि.१२.०७.२०२४ |
| दोषारोपाचा तपशील ठेवल्याची तारीख. | – | दि.२४.०२.२०२६ |
| पुरावा आरंभ केल्याची तारीख | – | दि.०५.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | – | ---- |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | – | दि. ०५.०८.२०२६ |
| शिक्षा असल्यास, आदेशाचा दिनांक | – | नाही. |

**(आरोपीचा तपशिल)**

| अ.क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा दिली किंवा निर्दोष सोडले | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षेदरम्यान तुरुंगात असल्यास तो कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाळु उर्फ तुकाराम व्यंकट आरदवाड | समजपत्र देण्यात आले | समजपत्र देण्यात आले | भा.दं.वि. कलम २९४, ३२३,५०४ ,५०६ सह ३४ प्रमाणे | निर्दोष सोडले | नाही. | नाही. |
| २. | उत्तम व्यंकट आरदवाड | | | | | | |

**(अभियोग पक्षाचे साक्षीदारांची यादी)**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराची भुमिका |
|---|---|---|
| सा.क्र.१ | राजकुमार गोपाळराव आकनगिरे | फिर्यादी |

**(अभियोग पक्षाचे कागदपत्रे )**

| अ.क्र. | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | १८ | घटनास्थळ पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| २ | १९ | वैद्यकिय प्रमाणपत्र |

**(आरोपी पक्षाचे कागदपत्रे )**

| अ.क्र. | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**न्या य नि र्ण य**

(घोषित दिनांक ०५ ऑगस्ट २०२६)

सदरच्या केसमध्ये आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम २९४,३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत.

**सरकार पक्षाची फिर्याद थोडक्यात खालीलप्रमाणे –**

०२. दि.०१.०४.२०२४ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वाजताच्या सुमारास रेणापूर येथील माऊली ट्रेडर्स दुकानासमोर फिर्यादी बसलेले असताना आरोपी तेथे आले व फिर्यादीच्या गचीला धरुन गालात चापटा मारुन छातीत बुक्या मारुन कॅमेरा का लावलास , असे म्हणून फिर्यादीस तुझ्या मायचे भोक अशी अश्लील शिवीगाळ केली. आजच्या आज काढून घे असे म्हणून आरेरावीची भाषा केली. तसेच शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुद्ध प्रस्तुतची तक्रार दाखल केली.

०३. पोलिस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीप्रमाणे आरोपींविरोधात भारतीय दंड विधान कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा रजिस्टर नंबर १४७/२०२४ नोंदविण्यात आला. त्याप्रमाणे तपासी अंमलदार यांनी गुन्ह्याचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि गुन्ह्याचा तपास पुर्ण झाल्यानंतर तपासी अधिकारी यांनी न्यायालयात आरोपींविरुद्ध

दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपीं विरोधात भारतीय दंड विधान कलम २९४,३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये नि.क्र.१३ लगत दोषारोप निश्चित करुन नोंदविले आणि ते आरोपींना समजावुन सांगितले. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन न्यायालयाला केस चालविण्याची विनंती केली. त्यानंतर सरकार पक्षाने साक्षीदार क्र.१ – राजकुमार गोपाळराव आकनगिरे (नि.क्र.१३ लगत) यांना तपासले. सदरील साक्षीदार फितुर झाल्यामुळे सरकार पक्षाचा पुरावा नि.क्र.१ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द पुरावा आला नसल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ३१३ नुसार निवेदन नोंद करण्यात आले नाही.

०५. सरकार पक्षाचे आरोपींविरुद्धचे आरोप पाहता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले आहेत, त्यावरील कारणांसहित निष्कर्ष त्यांच्यासमोर दिलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०१.०४.२०२४ रोजी १०.३० वाजताच्या सुमारास आरोपींनी संगनमत करुन इच्छापूर्वक रेणापूर येथील माऊली ट्रेडर्समसमोर कामखेडा रोड, रेणापूर येथे फिर्यादीस तुझ्या मायचे भोक अशी अश्लील शिवीगाळ केली आणि भारतीय दंड विधान कलम २९४ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने हे सिद्ध केले आहे काय? | ...नाही. |
| २. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन इच्छापूर्वक फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि भारतीय दंड विधान कलम ३२३ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने हे सिद्ध केले आहे काय? | ...नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन इच्छापूर्वक फिर्यादीस शिवीगाळ करुन प्रक्षोभित केले जेणेकरुन त्याचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा आणि भारतीय दंड विधान कलम ५०४ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने हे सिद्ध केले आहे काय? | ...नाही. |
| ४ | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन इच्छापूर्वक फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली आणि भारतीय दंड विधान कलम ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने हे सिद्ध केले आहे काय? | ...नाही. |
| ५. | अंतिम आदेश ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

**–: का र ण मि मां सा :–**

**मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबत:–**

०६. सरकारी पक्षाचे असे कथन आहे की, दि.०१.०४.२०२४ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वाजताच्या सुमारास रेणापूर येथील माऊली ट्रेडर्स दुकानासमोर फिर्यादी बसलेले असताना आरोपी तेथे आले व फिर्यादीच्या गचीला धरुन गालात चापटा मारुन छातीत बुक्या मारुन कॅमेरा का लावलास , आजच्या आज काढून घे असे म्हणून आरेरावीची भाषा केली. तसेच फिर्यादीस तुझ्या मायचे भोक अशी अश्लील शिवीगाळ केली. धक्काबुक्की करुन जिवे मारण्याची धमकी दिली व त्यायोगे भादवी कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा केला. त्यामुळे सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या सर्व साक्षीदारांचे पुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे आहे.

०७. सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार क्र.१ फिर्यादी राजकुमार गोपाळराव आकनगिरे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि.०१.०४.२०२४ रोजी सकाळी १० ते ११ चे दरम्यान गावातील माऊली ट्रेडर्स कामखेडा रोड या दुकानासमोर घटना घडली. आरोपी व त्यांच्यामध्ये किरकोळ भांडणे झाली होती. याव्यतिरीक्त काही घडले नाही. पोलीसांनी त्यांची एका कागदावर सही घेतली होती, त्यात काय लिहीले होते हे त्यांना माहित नाही. सदर साक्षीदाराने इतर विरुध्द सुचना नाकारल्या.

८. सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार क्र.१ राजकुमार आकनगिरे याने फिर्यादीतील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. त्यामुळे फिर्याद शाबीत झाली असे म्हणता येणार नाही. सदर साक्षीदारालादेखील फितुर घोषित करुन सरकारी वकीलामार्फत उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु सदर प्रश्नादरम्यानदेखील आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होईल असे कोणतेही कथन अभिलेखावर आणण्यात आलेले नाही. फिर्यादीतर्फे दाखल पुरसीस नि.२० वरुन आरोपी व त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे दिसून येते.

९. सरकार पक्षातर्फे आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान कलम २९४, ३२३, ५०४,५०६ सह ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे सिद्ध होणेसाठी कोणतेही कथन अभिलेखावर आणण्यात आलेले नाही. सरकार पक्षातर्फे घेण्यात आलेल्या साक्षीदाराचा तोंडीपुरावा हा आरोपीवरील दोषारोपांच्या सिद्धतेसाठी कुचकामी ठरतो. त्यामुळे आरोपींविरुद्ध दोषारोप सिद्ध होत नाही. सरकार पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपींनी घटनेवेळी फिर्यादीस अश्लील शिवीगाळ करुन प्रक्षोभित केले, लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली ही बाब सिद्ध करण्याकरीता सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराची साक्ष उपयोगी पडत नाही.

१०. सरकार पक्षातर्फे घेण्यात आलेल्या साक्षीदाराची साक्ष पाहता आरोपींविरुद्ध भा.द.वि. कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा सिद्ध होत नाही. त्यामुळे सरकारपक्ष आरोपींविरुद्धचे दोषारोप सिद्ध करण्यास असमर्थ ठरला आहे. अशा मतास मी येत आहे. यास्तव मी मुद्दा क्र. १ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविते.

**मुद्दा क्र. ५ करीता –**

११. मुद्दा क्र. १ ते ४ चे नकारार्थी उत्तरामुळे आरोपी हा भारतीय दंड विधान संहिता कलम २९४, ३२३, ५०४,५०६ सह ३४ नुसार निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरलेले आहेत. या निष्कर्षासह मुद्दा क्र. १ ते ५ चे उत्तर समर्थनार्थ खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपीक्र.१ बाळु उर्फ तुकाराम व्यंकट आरदवाड व आरोपी क्र.२ उत्तम व्यंकट आरदवाड रा. रेणापूर ता.रेणापूर जि.लातूर याची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अनुसार (भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) अनुसार भारतीय दंड विधानाच्या कलम २९४,३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये आरोपांमधुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन न्यायालयाच्या स्वाधीन करण्यात येतो.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ४३७–अ, (भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१) अन्वये रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका व जामीन कदबा द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.)

Digitally signed by POOJA ANAND APTE
Date: 2026.08.05 16:36:14 +0530

ठिकाण–रेणापूर
दिनांक: ०५/०८/२०२६.

**( पी.ए.आपटे )**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रेणापूर.